Estd. 1962
NAAC "A" Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**संदर्भ :- १. आस्थापना विभागाचे परिपत्रक क्र. एसयुके / आस्थापना-२ / ३१८४, दि.०६/१२/२०१८**
**२. आस्थापना विभागाचे परिपत्रक क्र. एसयुके / आस्थापना-२ / ४८१९, दि.१२/१२/२०१९**

उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : नासद-२०११ /प्र.क्र.१७२ / १८-अ, मंत्रालय, मुंबई, दिनांक ०६/०९/२०११ रोजीच्या परीपत्रकान्वये महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ हा दि.०१ जुलै, २००६ पासून राज्यात लागू करण्यात आला आहे. सदरहून अधिनियमातील कलम ८ (१) व (२) नुसार प्रत्येक कार्यालयाने किंवा विभागाने नागरिकांची सनद तयार करून ती प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावयाची आहे. त्याचप्रमाणे तशी कार्यवाही केली नाही तर संबंधित अधिनियम, विनियम यामध्ये उल्लेखिलेली कारवाई संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून करावयाची आहे. असे सदर परीपत्रकामध्ये नमूद केले आहे.

तद्अनुषंगाने दि.०६/१२/२०१८ व दि. १२/१२/२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व प्रशासकीय विभाग व अधिविभागा अंतर्गत नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधांचा बोर्ड दर्शनी भागात लावणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार नागरिकांच्या सनदेचा बोर्ड तयार करून दर्शनी भागात लावल्या बाबतचा अहवाल सर्व प्रशासकीय विभाग व अधिविभागांनी दि.१०/०८/२०२० पर्यंत आस्थापना विभागास कळविण्यात यावा.

तसेच ज्या प्रशासकीय विभाग व अधिविभागांनी आजतागायत नागरिकांच्या सनदेचा बोर्ड तयार करून दर्शनी भागात लावलेला नाही अशा प्रशासकीय विभाग व अधिविभागांनी नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधांचा बोर्ड दर्शनी भागात लावण्यात यावा. तसेच याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल पंधरा दिवसात आस्थापना विभागास देण्यात यावा.

**कुलसचिव**

**जा.क्र. एसयुके/आस्थापना-२/** ११८५ **दिनांक :-** 28 JUL 2020

**प्रति,**

१. सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, समन्वयक व सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा.कुलसचिव व समकक्ष अधिकारी
३. संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र
४. संचालक, विद्यार्थी कल्याण
५. सर्व रेक्टर्स

**प्रत :-** मा.कुलगुरू, मा.प्र-कुलगुरू, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय.